# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 17 February 2025
# Time 11.00 to 11.05 AM
# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

नवी दिल्लीत आज पहाटे पाच वाजून ३६ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. त्याची तीव्रता चार रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू दिल्ली जवळ धऊला कुवा इथं जमिनीच्या खाली पाच किलोमीटर वर होता. यात अजून कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याच वृत्त नाही.

दरम्यान, या भूकंपानंतर आणखी काही धक्के बसण्याची शक्यता लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीच्या नागरिकांना शांत राहून याबाबत देण्यात येणाऱ्या सूचनांचं पालन करण्याचं आणि सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. प्रशासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेऊन असल्याच त्यांनी म्हंटल आहे.

****

प्रयागराजमधल्या महाकुंभमेळ्यामध्ये भाविकांसाठी उभारण्यात आलेलं आणि तब्बल ४० हजार चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेलं स्वच्छ सुजल गाव संपूर्ण देशासाठी आदर्श ठरलं आहे. विविध सरकारी उपक्रम इथं कार्यान्वित करण्यात आल्यानं हे गाव उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागातल्या परिवर्तनाचं समग्र दर्शन घडवणारं ठरलं आहे. राज्य सरकारनं केलेल्या ऐतिहासिक सुधारणांमुळे बदललेल्या गावांचं दर्शन घडवणाऱ्या राज्याच्या यशोगाथेची झलक प्रदर्शनात पर्यटकांना पाहायला मिळत आहे. बांदा, झाशी, चित्रकूट, ललितपूर आणि महोबा यासह बुंदेलखंड मधल्या पाणीटंचाईच्या समस्येवर कशा प्रकारे तोडगा काढण्यात आला, हे या नमुना गावानं दाखवून दिलं आहे.

दरम्यान, महाकुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सोईसाठी आणि अतिरिक्त गर्दीच नियंत्रण करण्यासाठी रेल्वे प्रशासनानं नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरुन विशेष रेल्वेगाड्या सुरू केल्या आहेत. आज पाच गाड्या सोडण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, काल महाकुंभमेळ्यात जवळपास दीड कोटी भाविकांनी स्नान केलं. १३ जानेवारीपासून सुमारे ५३ कोटी भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याची नोंद झाली आहे.

****

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं काल आदी महोत्सव २०२५ चं उद्घाटन झालं. या कार्यक्रमात त्यांनी गेल्या १० वर्षात आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक प्रभावी पावलं उचलण्यात आल्याचं सांगितलं. आदिवासी लोकांच्या परंपरा आणि राहणीमान देशाची संस्कृति समृद्ध करतात, असं त्या म्हणाल्या.

****

केंद्रीय श्रम, रोजगार, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांनी काल मुंबईत भाजपच्या 'युवा संवाद' कार्यक्रमात तरुणांना मार्गदर्शन केलं. आपल्या युवा शक्तीची क्षमता भारताला लवकरात लवकर विकसित राष्ट्र बनवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

****

भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. जानेवारीत एकंदर ७८ हजार २७ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इतर देशांमधून आयात मालावर अतिरिक्त शुल्क आकारण्याची घोषणा केल्यानंतर परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सावध पवित्रा घेतला असावा, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जळगाव जिल्ह्यातल्या जामनेर इथं काल नमो कुस्ती महाकुंभ-२ अंतर्गत देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. सध्या जागतिक पटलावर देशाचे, विशेषतः महाराष्ट्रातले खेळाडू आपले नाव कमावत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब असल्याचं ते यावेळी म्हणाले. या स्पर्धेत नऊ देशांतले कुस्तीपटू सहभागी झाले आहेत.

दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यातल्या सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा काल फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. महिलांनी पुढाकार घेतला, तर एखादी सहकारी बँक यशाच्या शिखरावर पोहचते, महिलांना अर्थकारण चांगलं कळतं असं, मुख्यमंत्री म्हणाले.

****

पुणे जिल्ह्यात जुन्नर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाचं उद्घाटन काल मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या हस्ते झालं. नवीन वकिलांनी पक्षकारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने सतत अध्ययन करायला हवं, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

सांगली जिल्ह्यातल्या मिरज इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात मॉड्युलर आय सी यु आणि मॉड्युलर ऑपरेशन थेएटरचं लोकार्पण वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते काल झालं. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातल्या गरीब रुग्णांना याचा फायदा होणार आहे.

****

बालस्नेही विधी सेवा योजना २०२४ बाबत जनजागृती करण्यासाठी सांगलीत काल एक शिबीर घेण्यात आलं. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सामान्य किमान कार्यक्रमाअंतर्गत आयोजित या शिबिरात बालश्रम प्रतिबंध, पोक्सो यासारख्या बालहक्कांच्या कायद्यांची तसंच ऑनलाईन तक्रार नोंदणीसाठीच्या टोल फ्री क्रमांकाबद्दल मुलांना माहिती देण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कसाबखेडा इथल्या आयुष्मान आरोग्य मंदिराची राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे. विविध अधिकार्यांनी पाहणी करून या केंद्राचं उत्कृष्ट कामकाज दिसून आल्यामुळे, ही निवड करण्यात आली.

****